**(सूचना:- बिंदूनामावली नोंदवही पडताळणीसाठी केलेल्या अर्जानुसार तपासणीसाठी देणेत आलेल्या तारखेची माहिती divcommpune.in या वेबसाईटवरील मागासवर्ग कक्ष या टॅबमध्ये "बिंदूनामावली पडताळणी कार्यक्रम" या कॉलममध्ये पहावी व तारखेस तपासणीसाठी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे.)**

# बिंदूनामावली तपासणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

(शासकीय/ निम-शासकीय कार्यालये यांनी भरावयाचा)

## अर्ज

**प्रति,**
मा. विभागीय आयुक्त,
मागासवर्ग कक्ष, विधानभवन,
विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे- १.

**विषय :- बिंदू नामावली नोंदवही पडताळणीसाठी तारीख मिळणेबाबत.**

महोदय,

वरील विषयास अनुसरुन सादर करणेत येते की, आमचे कार्यालयाची ........ , ........, ....... या संवर्गाची बिंदु नामावली नोंदवही आपणाकडे तपासणी/पडताळणीसाठी सादर करावयाची आहे. या संदर्भात खालीलप्रमाणे मुद्दयांची माहिती सादर करीत आहोत. तरी बिंदूनामावली नोंदवही पडताळणीसाठी तारीख मिळणेस विनंती आहे.

| **अ. क्र.** | **विषय** | **तपशील (सदर बाबींची पूर्तता केली अगर कसे? होय/नाही)** |
|---|---|---|
| १ | तपासणी करावयाच्या कार्यालयाचे नाव व पत्ता - | |
| २ | कार्यालयाचे कांही विभाग पुणे विभागाचे बाहेर आहेत काय? | |
| ३ | तपासणी करावयाचे संवर्ग संख्या (उदा. शिक्षक, लिपिक, शिपाई = ३ संवर्ग) | |
| ४ | तपासणी करावयाचे संवर्गाचे मिळून एकूण मंजूर पदे (संख्या) | |
| ५ | कार्यालयीन कर्मचाऱ्यांची संख्या ५०० पेक्षा जास्त असलेस मागासवर्ग कक्ष स्थापन करुन सदर कार्यालयाची प्राथमिक तपासणी त्यांचे मागासवर्ग कक्षाकडून देखील करुन घेतली आहे काय? | |
| ६ | बिंदूनामावली नोंदवही मधील प्रत्येक संवर्गाचा गोषवारा मागील ३ महिन्यापूर्वीपेक्षा जूना सादर केला आहे काय? | |
| ७ | कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे निवडयाद्या, नियुक्ती आदेश व निवड जात प्रवर्गाचे पुरावे उपलब्ध झाले आहेत काय? व ते जोडले आहे काय? | |
| ८ | पदोन्नतीबाबत डीपीसीचे प्रोसिडींगच्या प्रती सादर केल्या आहेत काय? | |
| ९ | सरळसेवा संवर्गामध्ये एखाद्या मागासवर्ग कर्मचाऱ्याची निवड त्याच्या स्वत:च्या मागास जात प्रवर्गात न होता खुल्या प्रवर्गातून झाली असलेस त्यास खुल्या प्रवर्गामध्ये नोंदविले आहे काय? | |
| १० | बिंदूनामावली, सरळसेवा भरती व पदोन्नती संदर्भात न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे / नाही, याबाबत प्रमाणपत्र सादर केले आहे काय? | |

| | | |
|---|---|---|
| ११ | अद्ययावत आकृतीबंध सादर केला आहे काय? | |
| १२ | अद्ययावत सेवाप्रवेश नियम सादर केले आहेत काय? | |
| १३ | प्राथमिक तपासणी प्राधिकारी यांनी अंतिम तपासणीसाठी पत्र सादर केले आहे काय? | |
| १४ | या कार्यालयाचा विहीत नमुन्यातील अर्ज व त्यासोबत, नमुना-I, नमुना-II, नमुना-III, परिशिष्ट अ,ब,क, नमुना-IV, नमुना-V, नमुना-VI, नमुना-VII, नमुना-VIII, नमुना-IX, नमुना-XI, नमुना-XII, प्रतिज्ञापत्र/हमीपत्र, प्रपत्र-अ, प्रपत्र-ब, प्रपत्र-क, प्रपत्र-ड, प्रपत्र ई-१ सादर केले आहेत काय? | |
| १५ | बिंदूनामावली नोंदवहीमध्ये पांढऱ्या शाईचा (खाडाखोड/पुनर्लेखन, कागदाची चिठ्ठी चिटकवणे यासाठी) वापर केला आहे काय? | |
| १६ | बिंदूनामावली नोंदवहीचे पृष्ठांकन केले आहे काय? | |
| १७ | शासकीय कार्यालयांनी बिंदूनामावली नोंदवहीच्या प्रत्येक पानावर नियुक्ती प्राधिकारी यांची स्वाक्षरी घेतली आहे काय? | |
| १८ | कार्यरत कर्मचाऱ्यांची जात प्रमाणपत्रे व जातवैधता प्रमाणपत्रे सादर केली आहेत का? | |
| १९ | जातवैधता प्रमाणपत्रे प्राप्त असलेबाबत नियुक्ती प्राधिकारी यांनी खात्री करून स्वाक्षरी केली आहे काय? | |
| २० | जातवैधता प्रमाणपत्राबाबत सामान्य प्रशासन विभाग, १६-ब, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक १८/५/२०१३ व दि. २१ ऑक्टोबर २०१५ नुसार मान्यता प्राधिकारी यांनी कार्यवाही केली आहे काय? | |
| २१ | दिनांक २५/५/१९९० पूर्वीचे भ.ज.क व भ.ज.ड प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना इतर मागास प्रवर्गामध्ये नोंदविले आहे काय? तसेच दिनांक १८/१०/१९९७ पूर्वी भ.ज.क व भ.ज.ड चे पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची नोंद खुल्या प्रवर्गात घेतली आहे काय? | |
| २२ | सेवाप्रवेश नियमांचे उल्लंघन करुन भरती/बढती केली आहे काय? | |
| २३ | बिंदूनामावली नोंदवहीसोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती उपलब्ध आहेत का? | |
| २४ | सन १९९७ ची व चालू वर्षाची सेवाज्येष्ठता यादी सादर केली आहे काय? | |
| २५ | यापूर्वी बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी झाली असलेस तपासणी अहवाल सोबत सादर केला आहे काय? | |
| २६ | मागील तपासणी अहवालामध्ये विचारण्यात आलेले खुलासे सोबत सादर केले आहेत काय? | |
| २७ | नियुक्ती प्राधिकारी म्हणून भरतीचे अधिकार प्रदान केलेचे शासनाचे आदेश सादर केले आहेत काय? | |
| २८ | मंजूर पदांचा आकृतीबंध दर्शविणारा शासन निर्णयाचा पदनिहाय तक्ता सादर केला आहे काय? | |
| २९ | कार्यालयाचा ई-मेल आयडी (Email ID) नमूद करावा | |
| ३० | सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २९/५/२०१७ अन्वये नियुक्ती प्राधिकारी यांनी सदर बिंदूनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी करून त्यानंतर अंतिम तपासणीसाठी अर्ज सादर केला आहे का? | |

| | | |
|---|---|---|
| ३१ | सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २९/५/२०१७ नुसार दिनांक १८/१०/१९९७ नंतरचे त्या-त्या जात प्रवर्गात वापरलेले बिंदूची संख्या व रिक्त बिंदूबाबतची माहिती  विहीत नमुन्यात सोबत जोडली आहे काय? | |
| ३२ | बिंदू नामावली नोंदवहीची तपासणी करावयाचे संवर्ग अनुसूचित क्षेत्रात (पेसा क्षेत्रात) येतात किंवा कसे? | |
| ३३ | सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक ०५/०३/२०१५ व २६/०६/२०१५ नुसार नियुक्ती प्राधिकारी यांनी अनुसूचित क्षेत्रातील भरावयाची पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या व्यक्तींमधून भरणेबाबत कार्यवाही केली आहे अगर कसे? | |

**मान्यता प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी**
**नाव :-**
**कार्यालयाचे नाव :-**
**शिक्का :-**

**नियुक्ती प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी**
**नाव :-**
**कार्यालयाचे नाव :-**
**शिक्का :-**

(**टीप:**- बिंदू नामावली नोंदवही पडताळणीसाठी सादर करीत असताना आपले कार्यालयाकडील जाणकार प्रतिनिधी यांनी सोबतचा छाननी अर्ज नियुक्ती प्राधिकारी यांचे स्वाक्षरीने प्रमाणित करून सादर करावा.)